# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट १३०-२३** **दिनांक :- २०/०४/२०२३**

## फायनान्स कंपनी व ग्राहकांची फसवणुक करून दुचाकी विक्री करणाऱ्या आरोपीतांना अटक नलासोपारा पोलीस ठाणे व गुन्हे शाखा कक्ष २ वसई यांची संयुक्त कामगिरी.

नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक २२/१२/२०२२ रोजी फिर्यादी नामे संकेत विष्णु मोहिते, रा. नालासोपारा हे त्यांचे ॲक्टीवा मोटार स्कुटरवरुन घरी जात असताना इसम नामे पॉल नाडर यांनी फिर्यादीचे मोटार स्कुटरचे लोनचे हप्ते प्रलंबित असल्याचे कारण सांगुन फिर्यादीची स्कुटर एल. ॲंड. टी. या फायनान्स कंपनीमध्ये जमा करावयाची आहे असे सांगुन नमुद स्कुटर ही कंपनीमध्ये जमा न करता ती परस्पर विक्री करुन त्यांचे स्कुटरचा अपहार करुन फसवणुक केलेबाबत फिर्यादी यांनी दिनांक १४/०४/२०२३ रोजी तक्रार दिल्याने नालासोपारा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I २१७/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नालासोपारा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार तसेच गुन्हे शाखा कक्ष २ वसई हे समांतर तपास करीत होते. सदर गुन्हयाबाबत गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी नामे १) पॉल मुर्गन अनबल्गन नाडर २) सलमान हनीफ शेख ३) सुधांशु ममुराली कनोजिया सर्व रा. नालासोपारा यांना ताब्यात घेवनु तपास केला असता सदर अरोपीत यांनी आपसात संगणमत करुन वा नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक १६/०४/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीत यांचेकडे अधिक विचारपुस करता त्यांनी अशाच प्रकारच्या अनेक दुचाकी परस्पर विक्री केल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाल्याने सदर अरोपीत यांनी परस्पर अपहार केलेल्या व विक्री केलेल्या १०,९०,०००/- रुपये किंमतीच्या एकुण १७ दुचाकी हस्तगत करण्यात आलेल्या आहेत तसेच गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांचेकडून एकुण १०,५०,०००/- रुपये किंमतीच्या १७ दुचाकी हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. अशा प्रकारे करण्यात आलेल्या संयुक्त कारवाई दरम्यान आतापर्यंत एकुण ३४ दुचाकी किंमत रुपये २१,४०,०००/- हस्तगत करण्यात यश मिळवलेले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, विरार, श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नालासोपारा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. विलास सुपे, पो.नि. राहुल सोनावणे गुन्हे, स.पो.नि. पंडीत मस्के, अमोल तळेकर, पो.हवा. किशोर धनु, सचिन कांबळे, पो.ना. प्रशांत साळुंखे, अमोल तटकरे, पो.अंम. कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर, पोना/ढोणे नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय, म.सु.ब. मनोज पाटील तसेच

गुन्हे शाखा कक्ष २, वसईचे पो.नि. श्री. शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. संजय नवले, मंगेश चव्हाण, रमेश भोसले, पो.हवा. चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांत ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे यांनी केली आहे.




-----ooo----